# क्विक हिल फाउंडेशनचा जीवनकौशल्य प्रकल्प




**पुणे :** क्विक हिल फाउंडेशनने वसंतदादा पाटील हायस्कूल येथे संवाद सत्राचे आयोजन केले. या कार्यक्रमाला पुणे महानगर पालिकेचे शिक्षण अधिकारी माळी आणि क्विक हिल टेक्नोलॉजीसचे एमडी कैलाश काटकर यांची विशेष उपस्थिती लाभली. या सत्रात इयत्ता ८ वी, ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांनी क्विक हिल फाउंडेशन आणि पंख फाउंडेशनच्या 'शाळांगण'च्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या मार्गदर्शन सत्रात आलेल्या अनुभवांचे कथन केले. या मार्गदर्शनपर सत्रांदरम्यान विद्यार्थ्यांसोबत संवाद साधण्यात आला. त्यावेळी पौगंडावस्थेतील वर्तणुक समस्या, कौटुंबिक समस्या, व्यसन, अभ्यासातील अडचणी लैंगिक शिक्षण, एचआयव्ही आणि एड्स जागरुकता, बाल आणि लैंगिक गैरवर्तनासंबंधीचे शिक्षण इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात आली.

काटकर म्हणाले, चांगल्या प्रकारचे शिक्षण पुरवण्याव्यतिरिक्त मुलांना, प्रामुख्याने पौगंडावस्थेतील नवयुवकांना शिक्षणात लक्ष केंद्रीत करण्याच्या दृष्टीने पालक व शिक्षकांना साह्य करणे ही आमची बांधिलकी आहे.